# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

शासकीय तंत्रनिकेतना च्या बाजूला, उस्मानपुरा,
पत्र पेटी क्रमांक -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५
(०२४०)२३३४२१६ (P),२३३४७६९ (O),२३४०६५८(R),Fax-०२४०-२३५६८२०
Email :roaurangabad.dte@gmail.com Web: http://www. dteau.org

**परीपत्रक :**

जा.क्र.विकाऔ/आस्था-२/२०१६/ ६८७८
दिनांक :- 23 NOV 2016

प्रति,
संचालक,श्री गुरुगोविंदसिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था,नांदेड.
प्राचार्य,
कमला नेहरु पॉली.(फार्मसी)औरंगाबाद/ इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी,गढी गेवराई/ श्री शिवाजी इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी,परभणी/ चन्नबसवेश्वर फार्मसी पॉलीटेक्निक,लातुर/ नांदेड फार्मसी, नांदेड/ महाराष्ट्र पॉलि.(डि.फार्मसी) इन्स्टिटयुट,निलंगा/इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी, उस्मानाबाद.

**विषय :- गट-क व गट-ड मधील कर्मचा-यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठीतता घालविण्यासाठी सुधारीत सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ लागु करणे बाबत**

संदर्भ :- १.उच्च व तंत्रशिक्षण विभाग,शासन निर्णय क्र.एनजीसी-१७९४/१८०९१/(२७९६) विशिं४,दि.०८/१०/ १९९७.
२.उच्च व तंत्रशिक्षण विभाग,शासन निर्णय क्र.संकिर्ण-२००१/(१४७/०१) विशि-४, दि.२३/०८/२००४.
३.वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३, दिनांक.०१ एप्रिल २०१०.
४.वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन-११०९/प्र.क्र.४१/सेवा-३, दिनांक.०५ जुलै २०१०.
५.वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन-१११९/प्र.क्र.८/सेवा-३, दिनांक.०१ जुलै २०११.

उपरोक्त विषयी आपणांस सुचित करण्यात येते की, गट-क व गट-ड मधील कर्मचा-यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठितता घालविण्यासंबंधी सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेतंर्गत **दिनांक ३१-०३-२०१५ रोजी अथवा त्यापुर्वी एकाच पदावर १२ वर्षे नियमित सेवा** केली असेल अशा **गट-क व गट-ड कर्मचा-यांची** माहिती सोबत जोडलेल्या विहित प्रपत्र-**अ** मधे भरुन **दि.२५/११/२०१६ पर्यंत** या कार्यालयास पाठवावी.

सदर माहिती **ISM DV-TT Natraj** या फॉंटमध्ये तयार करण्यात यावी. तसेच यापुर्वी विहीत अटी व शर्तीची पुर्तता न केल्यांने नामंजूर केलेल्या कर्मचा-यांचे प्रस्ताव वेगळे पाठविण्यात यावेत. प्रपत्र-अ मधील माहिती सेवापुस्तक अद्ययावत करुन अचूक भरण्यात यावी. सेवापुस्तक अथवा प्रपत्रातील अपूर्ण माहितीमुळे एखादया कर्मचा-याचे प्रकरण ऐनवेळी नाकारले गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेतील संबधित लिपीक कर्मचारी यांची राहिल. तसेच पाठविलेल्या माहितीची **Soft Copy** या कार्यालयाच्या इमेलवर पाठविण्यात यावी .

तसेच आपल्या कार्यालयाची माहिती **निरंक** असल्यास तसे या कार्यालयास कळविण्यात यावे. प्रस्तावित केलेल्या कर्मचा-यांच्या गोपनीय अहवालाच्या प्रतवारीची माहिती सादर करावी. प्रत्यक्ष बैठकीच्यावेळी कर्मचा-यांचे मागील **५ वर्षाचे गोपनीय अहवाल प्रपत्र-ब (मूळ गोपनीय अहवालासह)** घेऊन यावेत. बैठकीचा दिनांक स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

**सहपत्र : प्रपत्र अ व ब**

**(महेश शिवणकर)**
**प्र.सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद**

# प्रपत्र-अ

गट-क/ड मधील कर्मचा-यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठीतता घालविण्यासंबंधो सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेतंर्गत दि.३१-०३-२०१५ पर्यंत पात्र असलेल्या कर्मचा-यांची **(पहिल्या लाभाच्या योजनेसाठी)** माहिती.

**संस्थेचे/कार्यालयाचे नांव:-**

| अ. क्र. | कर्मचा-याचे नांव व पदनाम | जन्म-दिनांक | प्रथम नियुक्तीचा दिनांक | मान्यते बाबत संचालनालयाच्या आदेशाचा क्रमांक व दि. सेवा नियमित केल्याचा दिनांक | शैक्षणिक पात्रता | एतदर्थ मंडळाची मराठी/ हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण आहे काय? | मराठी/हिंदी परिक्षा उत्तीर्ण होण्या पासून सूट मिळाली आहे काय? असल्यास पत्र क्र.व दि. | संगणक अर्हता परिक्षेचा तपशील (उत्तीर्ण झाल्याचा महिना वर्ष ) | प्रवर्ग व जात | मागासर्गीय असल्यास जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाले किंवा कसे | विनावेतन रजा असल्यास त्याचा तपशील | सध्या घेत असलेले वेतन बँड व ग्रेड वेतन व मुळवेतन | विद्यमान पदावरील १२ वर्ष पूर्ण होण्याचा दिनांक | आश्वासित प्रगती योजने अंतर्गत अनुज्ञेय असलेले वेतन बँड व ग्रेड वेतन व पदनाम | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| | | | | | | | | | | | | | | | |

टिप : सदर प्रपत्रातील माहिती A-३ पेपरवर अचूकपणे पाठविण्यात यावी.

संस्था प्रमुखाची स्वाक्षरी/-

# प्रपत्र-ब

कर्मचा-याना पदोन्नत्तीच्या संधी उपलब्ध नसलेल्यांना कुंठीतता घालविण्यासंबधी आश्वासित प्रगती योजनेतंर्गत पात्र असलेल्या कर्मचा-यांची पात्र दिनांकापासून मागील पाच वर्षाचे वर्ग-३/४ च्या कर्मचा-यांचे वार्षीक गोपनीय अहवालाचे मुल्यांकन.

संस्थेचे/कार्यालयाचे नांवः-

| अ. क्र. | कर्मचा-यांचे नाव व पदनाम सर्वश्री | वार्षीक गोपनीय अहवालाची प्रतवारी | | | | | | | गोपनीय अहवालाची प्रतवारीची सरासरी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २००८-२००९ | २००९-२०१० | २०१०-२०११ | २०११-२०१२ | २०१२-२०१३ | २०१३-२०१४ | २०१४-२०१५ | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| | | | | | | | | | | |

**टिपः** सदर बैठकीस उपस्थित राहतांना Below Avarage C. R. असणा-या वर्ग-४ कर्मचा-यांची वैयक्तक नस्ती सोबत घेऊन यावे.

संस्था प्रमुखाची स्वाक्षरी/-